# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

---

**दिनांक ०९.०६.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**कुख्यात गुंड हद्दपार :—**

पोलीस ठाणे शांतीनगर हददीत चित्रशाळा माता मंदीरजवळ, प्रेमनगर, नागपूर येथे राहणारा गुन्हेगार ईसम नामे श्रीधर उर्फ राजा उर्फ राजु तुळशीराम कारेमोरे वय ५० वर्षे याचेविरूध्द पोलीस ठाणे शांतीनगर येथे गंभीर स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल असुन, त्याचेवर वारंवार कारवाई करूनही त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमाचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता शांतीनगर पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०३ नागपुर शहर याचेकडे सादर केला. मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०३, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. १९/२०२६ दिनांक २९.०५.२०२६ अन्वये वर नमुद गुन्हेगारास नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतून ०३ महीन्याकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केला. नमुद गुन्हेगाराचे हद्दपार आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली असुन, शांतीनगर पोलीसांनी नमुद हद्दपार इसमास दिनांक ०५.०६.२०२५ रोजी त्याचे नातेवाईक यांचेकडे सोडलेले आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप—आयुक्त (परि. ०३) नागपुर शहर, मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. गजानन तामटे, पोउपनि कुलदीप कदम, पोहवा. प्रविण गोरटे, पोअं. उमेश पडोळे यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे सोनेगाव :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०९.०६.२०२६ चे ०१.०० वा. ते ०३.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे सोनेगाव हद्यीत प्लॉट क्र. ८१/ए, सुजाता ले आऊट, इंद्रप्रस्थ नगर, सोनेगाव, नागपुर येथे राहणारे फिर्यादी अंकित राजकुमार भैसारे वय ३५ वर्षे हे आपले राहते घराचे पहिल्या माळयावरील रुमला कडी लावून खालचे माळयावर परिवारासह झोपलेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे रुमचे दाराची कडी उघडून, आंत प्रवेश करून, बेडरूममधील कपाटातील रोख २,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,८३,४००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सोनेगाव येथे पोउपनि. सुर्यवंशी यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे सदर :— गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी प्रसाद गणेश बोकडे वय ३२ वर्षे, रा. पवनी, जिल्हा भंडारा हे त्यांचे चारचाकी वोक्सवॅगन गाडी क्र. एमएच ४० एसी ११०५ ने पत्नी व मुलगी साईशा वय ०६ वर्ष तसेच मित्र नामे आकाश चंद्रकांत

गजभिये यांचेसह खरेदी करीता नागपूर येथे आले होते. दिनांक ०८.०६.२०२६ चे १६.४५ वा. चे सुमारास ते पोलीस ठाणे सदर हद्दीतील एलआयसी चौक ते काटोल नाकाकडे जाणारे ओव्हरब्रिजवरुन जात असता, टोयाटो ग्लॅन्झ कार क्र. एमपी २८ सीबी ८६३८ चा चालक नामे शाहीद हसन हबीब हसन वय ४५ वर्ष रा. चनकापूर डब्ल्यूसीएल कॉलनी, खापरखेडा, नागपूर याने त्याचे ताब्यातील कार भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे गाडीला समोरुन धडक दिली. तसेच फिर्यादीचे मागून येणारी चारचाकी गाडी क्र. एमएच ४९ एएस ६८८५ ही गाडी फिर्यादीचे गाडीला धडकल्याने अपघात होऊन फिर्यादीची मुलगी नामे साईशा व मित्र आकाश हे दोघे गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता लता मंगेशकर हॉस्पीटल येथे दाखल केले आहे. उपचार सुरू आहे.

यात्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सदर येथे पोउपनि. रुपेश जांभळे ७७४१०८८१०९ यांनी टोयाटो ग्लॅन्झ चालकाविरूध्द कलम २८१,१२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १८४, मो.वा. का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे नवीन कामठी:—** दिनांक ०९.०६.२०२६ चे ०९.१५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे नवीन कामठी हद्दीत, कामठी—नागपूर हायवे रोडचे बाजुला, बुध्दभुमी खैरीचे समोर एक अनोळखी पुरुष इसम वय अंदाजे ४० वर्ष वयाचे, अंगात पांढरी बनियान व काळा पॅन्ट घातलेले, बेशुध्द अवस्थेत मिळून आले. नवीन कामठी पोलीसांनी त्यांना उपचाराकरीता उपजिल्हा रुग्णालय, कामठी येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी सरतर्फे फिर्यादी बिट मार्शल किशोर काकडे यांचे सुचनेवरून पोलीस ठाणे नवीन कामठी येथे पोउपनि विकास तिडके यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे अजनी :—** महेंद्र मुलचंद मेहर वय ३८ वर्षे रा. विनोबा भावे नगर, गांधी पुतळयाजवळ, यशोधरानगर, नागपूर हे दिनांक २२.०४.२०२६ चे ११.०० वा. पासुन पोलीस ठाणे अजनी हद्दीतील संतोष पकोडेवाला दुकानातून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत गेले नाहीत. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाहीत. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—मध्यम, उंची— ५ फुट ६ इंच, केस— काळे, भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**२) पोलीस ठाणे बेलतरोडी :—** सौरभ शांतारामजी गुरनुले वय २५ वर्षे रा. सरकारी हॉस्पिटल मागे, चिचभवन, वर्धा रोड, नागपूर हे दिनांक ०१.०६.२०२६ चे ०९.०० वा. पासून पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळाले नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—लांब, बांधा—सडपातळ, उंची— ५ फुट ५ इंच, केस— काळे, अंगात—काळया रंगाचा टिशर्ट व बरमुडा घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**३) पोलीस ठाणे यशोधरानगर :—** हरिदयाल लच्छीप्रसाद पवार वय ४१ वर्षे रा. म्हाडा कॉलनी, भिलगाव, नागपूर हे दिनांक ०६.०५.२०२६ रोजी पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—मजबुत, उंची— ५ फुट ३ इंच, केस— काळे, अंगात आसमानी रंगाचा फुल शर्ट व काळा फुलपॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**४) पोलीस ठाणे यशोधरानगर :–** इमरान इस्माईल शेख वय ३४ वर्षे रा. प्लॉट क्र. ८९२, गली क्र. ३६, नागसेनवर, नागपूर हे दिनांक ०३.०६.२०२६ रोजी पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा–मजबुत, उंची–५ फुट ३ इंच, केस–काळे, अंगात–आसमानी रंगाचा फुल शर्ट व काळा फुलपॅन्ट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात.

**५) पोलीस ठाणे अंबाझरी :–** सानिया सदाशिव मरसकोल्हे वय २२ वर्षे रा. जुना फुटाळा, गौतमचे घराजवळ, अमरावती रोड, अंबाझरी नागपूर ही दिनांक ०७.०६.२०२६ रोजी १०.०० वा. पासून पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग–गोरा, चेहरा–गोल, बांधा–सडपातळ, उंची–५ फुट ३ इंच, केस–काळे लांब, अंगात–काळया रंगाचे फुलाची कुर्ता व पांढरी लॅगीन घातलेली आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलते..



महेंद्र



सौरभ



हरिदयाल



इमरान



सानिया

**(ईतर)**

**१) आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्रं. ०६, नागपुर. | ३१००९३५ /२००३ | कलम ३०४(अ) भा.दं.वि. | ओमप्रकाश शिवचरण यादव वय २५ वर्ष रा. हुडको कॉलनी, एनआयटी प्लॉट, बजरंग बली मंदीरजवळ, जरीपटका नागपुर | ११.०६.२०२६ |

**२) पोलीस ठाणे शांतीनगर येथील ''बेवारस वाहनांचे लिलाव'' बाबत सुचना :–**

पोलीस ठाणे शांतीनगर नागपुर शहर, येथे बेवारस वाहने (**लावारीस, विना दाव्याचे दुचाकी वाहने**) एकुण १८ वाहने जमा असुन, त्या वाहनाकरीता पो. ठाणे शांतीनगर येथे कोणीही दावा केलेला नाही. तसेच, या वाहनाचे मालक अद्याप मिळुन आलेले नाही. नमुद बेवारस दुचाकी वाहनांबाबत लिलावाची प्रक्रीया दिनांक १५.०६.२०२६ चे ११.०० वा. पोलीस ठाणे शांतीनगर येथे करण्यात येणार आहे.

**पोलीस ठाणे शांतीनगर येथे जमा बेवारस वाहन यादी**

| अनु क्र | माल नं | वाहनांचे नाव | वाहन क | चेचीस नं | इंजीन नं |
|---|---|---|---|---|---|
| १ | १/२५ | H.H.Splendar | MH31-DM-6095 | ME4JC472GA8047594 | JC47E0071878 |
| २ | २/२५ | Suzuki | MH49-BJ-3830 | MB8DP11AKK8G19667 | AF216195588 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | ३/२५ | H.H.PASSION | MH31-CE-6774 | 07C08M25245 | |
| ४ | ४/२५ | H.H.Splendar | MH31-BF-8457 | 02J20C15597 | |
| ५ | ५/२५ | ACTIVA | MH49-BM-9221 | MEJF913KLW192767 | |
| ६ | ६/२५ | Suzuki ACCESS | MH49-K-4077 | MB8CF4CALC8270360 | F4862172615 |
| ७ | ७/२५ | LUNA | MH31-BC-8436 | | |
| ८ | ९/२५ | Suzuki ACCESS | MH49-Z-0008 | MB8CF4CACF8569015 | F4862740669 |
| ९ | १०/२५ | H.H.PASSION | MH31-LS-3870 | MBLHAWEL8GE36044 | HA10EB8GE40522 |
| १० | ११/२५ | TVS SCOOTY | MH31-AW-2816 | K01KF655430 | K01KM646905 |
| ११ | १२/२५ | TVS | MH49-BL-1282 | ME4JF50AMKD155850 | JF50ED0155951 |
| १२ | १३/२५ | TVS SCOOTY | MH31-BD-2664 | K02HF764320 | |
| १३ | १४/२५ | H.H.Splendar | MH31-BG-6359 | 03F20C21318 | 03F18M24842 |
| १४ | १५/२५ | CD100 | MH35-D-1337 | 96L12F01218 | |
| १५ | 242/2021 | SPLENDAR | | 11A1714536 | 11A19C13512 |
| १६ | 106/2022 | MAXI | | नंबर अस्पष्ट | 11/8/2022 |
| १७ | 152/2022 | UNICON | | KC09E904369 | ME4KC092F68043 |
| १८ | 77/2023 | HIRO HONDA CD DON | | 03127131294 | नंबर दिसत नाही |

नमुद दुचाकी वाहनाच्या लिलावात ज्यांना भाग घ्यावयाचा आहे, अशा परवाना धारक खरेदी करणाऱ्यांनी खालील अटी व शर्तीवर लिलावाकरिता दिनांक १५.०६.२०२६ चे ११.०० वा. प्रत्यक्ष हजर राहुन, बोली बोलता येईल.

**<u>अटी व शर्ती :—</u>**

१) लिलावात भाग घेणाऱ्या परवानाधारक यांनी अनामत रक्कम १०,०००/— रू. पोलीस ठाणे शांतीनगर येथे दिनांक १५.०६.२०२६ चे ११.०० वा. पुर्वी जमा करावी.

२) लिलावात भाग घेतांना परवाना धारक भंगार खरेदी करणाऱ्यांनी आपले ओळखपत्र/आधारकार्ड तसेच, परवानाचे कागदपत्र सोबत जवळ ठेवावे.

३) लिलाव धारकाने अंतिम केलेली संपुर्ण रक्कम त्याच दिवशी भरावी लागेल.

४) ज्या लिलाव धारकाने अंतिम बोली लावुन दुचाकी वाहन विकत घेतले आहे, तथापि लिलावाची संपुर्ण रक्कम भरणा केलेली नाही. अश्या धारकाविरूध्द फौजदारी स्वरूपाची कार्यवाही करण्यात येईल.

५) लिलावधारकाने दुचाकी वाहन बोली झाल्यावर तात्काळ स्वखर्चाने घेवुन जावे लागेल.

६) लिलावधारकाने विहीत कालावधीत दुचाकी वाहन उचल न केल्यास ती जप्त करून फेरलिलाव घेण्यात येईल व अनामत रक्कम परत मिळणार नाही.

७) लिलावधारकाने दुचाकी वाहनांचा भंगार मध्ये कटरने कापुन विल्हेवाट लावावी, त्याकरीता कटर साहीत्य सोबत आणावे.

८) लिलाव झालेल्या वाहनाचा रोडवर चालविण्यासाठी वापर होणार नाही. झाल्यास लिलाव धारकाविरूध्द फौजदारी स्वरूपाची कार्यवाही करण्यात येईल.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**